



## देवी घटस्थापनेचा मुहूर्त सकाळी सहापासुन

**चुरणी, ( दि. 2 )-** आश्विन शुक्ल प्रतिपदेच्या दिवशी म्हणजे 3 ऑक्टोबर 2024 रोजी गुरुवारी सकाळी 6 वाजतापासुन घटस्थापनेसाठी वेगवेगळे तीन मुहूर्त यंदा आहेत. मुहुर्ताच्या या वेळांमध्ये कोणत्याही वेळी घटस्थापना करुन नवरात्रीला पुजन करता येणार आहे. यावर्षी आश्विन शुक्ल 1तीय तिथीची वुध्दी झाल्याने नवरात्र दहा दिवसांचे आले आहे यामध्ये 7 ऑक्टोबर रोजी ललिता पंचमी असुन 10 ऑक्टोबर रोजी महालक्ष्मी पुजन म्हणजेच घागरी फुंकणे आहे. 11 रोजी महाष्टमीचा व नवमी उपवास एकाच दिवशी असुन 12 ऑक्टोबर रोजी शनिवारी नवरात्रोत्थापन नवरात्र समाप्ती आणि दसरा आहे. नवरात्रीला आता काही तासांचा अवधी उरला असल्याने मातेच्या आगमनासाठी सर्वत्र लगबग सुरु आहे. मध्यप्रदेशातील पंडित मधुसुदन जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार घटस्थापनेसाठी गुरुवारी सकाळी 6 वाजतापासुन 7.30 वाजेपर्यंत त्यानंतर सकाळी 10.30 वाजेपासुन दुपारी 2.56 वाजेपर्यंत तर सायंकाळी 4.30 वाजेपासुन रात्री 8.56 वाजेपर्यंत मुहूर्त आहेत. आणि विजया दशमी दसरा सीमोल्लंघन हे 12 ऑक्टोबर रोजी असुन साडेतीन मुहुर्तापैकी एक असलेला दसरा हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. या दिवशी विजय मुहुर्तावर अनेक लोक आपल्या नवीन उपक्रमाचा आरंभ करतात, हा विजय मुहुर्त महाराष्ट्रात 2.22 ते 3.09 या दरम्यान आहे.

# आजपासून शारदीय नवरात्र उत्सवाची धुम

### भाविकांमध्ये प्रचंड उत्साहात

### बाजारपेठेत उसळली गर्दी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )-** शारदीय नवरात्री उत्सवाला उद्या 3 ऑक्टोंबरपासून सुरुवात होत आहे. या अनुषंगाने अंबा-एकवीरा देवी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी वाढणार आहे. यासाठी अंबा-एकवीरा देवी मंदिर प्रशासन व पोलिस विभागाने सुरक्षेच्या अनुषंगाने चोख व्यवस्था केली आहे.

पोलीस आयुक्तालयाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये 23 पोलिस उपायुक्त, 5 सहायक पोलिस आयुक्त, 25 पोलिस निरीक्षक, 70 सहायक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक, आरसीपी आणि क्यूआरटी पथकांसह 1350 पोलिस अधिकारी, राज्य राखीव पोलिस दलाची एक कंपनी



आणि 500 स्त्री-पुरुषांचा होमगार्ड यांचा समावेश आहे. पोलीस ठाणे निहाय शहरातील महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील वसाहतींमध्ये फिक्स पॉइंट बसविण्यात येणार आहेत. सीआर आणि दामिनी पाठक गस्त घालणार आहेत. पोलिस विभागाकडून फिक्स पॉइंट ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय 12 सीआर मोबाईल व्हॅन, 6 दामिनी पाठक, बीट मार्शल आणि डायल 112 वाहने नागरिकांच्या सुरक्षेसाठी गस्त घालत राहणार आहेत. नवरात्रोत्सवात दुर्गा देवी, शारदा देवी दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी होती. तसेच गरबा कार्यक्रमातही मोठी गर्दी उसळले.

त्यामुळे महिलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने प्रत्येक ठिकाणी जास्तीत-जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. तसेच महीला मुलीचे सुरक्षेततेकरीता महिला स्वयंसेवकांचीही नेमणूक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलिस विभागाकडून मिरवणुक मार्गावर सीसीटीव्ही, व्हीडीओग्राफर यांचे माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. नवरात्रीला आता काही तासांचा अवधी उरला असल्याने मातेच्या आगमनासाठी सर्वत्र लगबग सुरु आहे. मध्यप्रदेशातील पंडित मधुसुदन जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार घटस्थापनेसाठी गुरुवारी सकाळी 6 वाजतापासुन 7.30 वाजेपर्यंत त्यानंतर सकाळी 10.30 वाजेपासुन दुपारी 2.56 वाजेपर्यंत तर सायंकाळी 4.30 वाजेपासुन रात्री 8.56 वाजेपर्यंत मुहूर्त आहेत. आणि विजया दशमी दसरा सीमोल्लंघन हे 12 ऑक्टोबर रोजी असुन साडेतीन मुहुर्तापैकी एक असलेला दसरा हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. या दिवशी विजय मुहुर्तावर अनेक लोक आपल्या नवीन उपक्रमाचा आरंभ करतात, हा विजय मुहुर्त महाराष्ट्रात 2.22 ते 3.09 या दरम्यान आहे.

### सीपींकडून अंबा-एकविरा देवी मंदिराचा आढावा

नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी 2 ऑक्टोंबर रोजी अंबा देवी व एकविरा देवी परिसरातील सुरक्षेचा आढावा घेतला. दोन्ही संस्थाच्या पदाधिकार्यांसोबत चर्चा करून सुरक्षेच्या अनुषंगाने योग्य ते दिशा-निर्देश दिले. त्यानंतर त्यांनी गांधी चौक ते राजकमल चौकापर्यंत भरणार्या यात्रेच्या मार्गाची पाहणी केली. त्यानुसार तेथील सुरक्षेच्या अनुषंगाने निर्देश दिले. अमरावती शहरातील सुजाण नागरिकांना नमुद सण उत्सव शांततेने तसेच आंनदात पार पडावा याकरीता, पोलीस विभागास सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी केले आहे.

### 492 दुर्गा देवी, तर 102 शारदा देवी मुर्तींची स्थापना

3 ऑक्टोंबर रोजी अमरावती शहरातील 492 दुर्गा देवी मंडळात तर 102 शारदा देवी मंडळांमध्ये मुर्तींची स्थापना केली जाणार आहे. 3 ते 12 ऑक्टोंबरदरम्यान साजरा होत असलेल्या नवरात्रोत्वात 65 ठिकाणी गरबा नृत्य कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे. या अनुषंगाने पोलिस प्रशासन अलर्ट झाला असून, दुर्गा देवी व शारदा देवी मंडळांनी नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. गुरुवारी शहरातील विविध ठिकाणांवरून नवदुर्गा देवी मंडळांकडून मिरवणुक व शोभायात्रा निघणार आहे.

### हे मार्ग राहतील बंद

राजकमल चौक ते अंबागेटपर्यंत, साबनपुरा खिडकी ते गांधी चौकापर्यंत, ओसवाल भवन ते गांधी चौकापर्यंत, डॉ. धवड यांचा दवाखाना ते गांधी चौकापर्यंत, मुख्य पोस्ट ऑफीस रोड ते पंचशिल लॉन्ड्री ते गांधी चौकापर्यत, भुतेश्वर चौक ते गांधी चौकापर्यंत, नमुनाकडून अंबादेवी देवस्थानाकडे जाणारे सर्व लहान रस्ते बंद राहील. सक्करसाथ ते भाजीबाजार जैन मंदीरापर्यंत, अंबागेट ते औरंगपुरा मार्गे अंबादेवी मंदिराकडे जाणारा मार्ग सवं वाहनास बंद राहील. टांगापडाव ते साबनपुरा पोलीस चौकी ते प्रभात चौक हा रस्ता अरुंद असल्याने जड वाहनास बंद राहील.

## लहान भावाचा मोठ्या भावावर चाकूने हल्ला

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.2 ) -** घरात आई-वडिलांशी भांडण करणार्या धाकट्या भावाला रोखण्याचा प्रयत्न केला असता लहान भावाने मोठ्या भावावर चाकूने हल्ला केला. सदर घटना परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देशमुख प्लॉटमध्ये 29 सप्टेंबर रोजी रात्री घडली. जखमी अजयसिंग विजयसिंग ठाकूर (वय 35) यांच्यावर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेच्या तक्रारीवरून एक ऑक्टोबर रोजी पोलिसांनी लहान भाऊ हेमंतसिंग ठाकूर (28) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



देशमुख प्लॉट, परतवाडा येथे राहणारे अजयसिंग ठाकूर हे 29 सप्टेंबरच्या रात्री मित्रांसोबत बाहेरगावी गेले होते. दरम्यान,त्यांना वडील विजयसिंग यांचा फोन आला की, हेमंतसिंग घरात भांडण करीत असून, भांड्यांची फेकफाक करीत आहे. वडिलांच्या सांगण्यावरून अजयसिंग ठाकूर यांनी तत्काळ घरी पोहोचून लहान भाऊ हेमंतसिंग याला समजावून सांगण्यास सुरुवात केली. मात्र तो ऐकत नसल्याने त्याने त्याला दोन तीन थापडा लगावल्या.

याचा राग आल्याने लहान भाऊ हेमंतसिंग याने अजयसिंगच्या कमरेच्या वर चाकूने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यात अजयसिंग गंभीर जखमी झाला. कुटुंबीयांनी जखमी अजयसिंह ठाकूर यांना तातडीने अमरावती येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू असून, अजयसिंग ठाकूर यांच्या फिर्यादीवरून परतवाडा पोलिसांनी लहान भाऊ हेमंतसिंग ठाकूरविरुद्ध कलम 109 अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## नितेश राणेच काढताहेत महायुती सरकारची हवा

### कोट्यावधींच्या योजनांवर पाणी फेरण्याचे काम

**रोहित गासे**

**अमरावती,( दि.2 ) -** लोकसभा निवडणूकीत महायुतीला महाराष्टात झटका बसल्यानंतर 'टॉप गियर' टाकत महायुती सरकारने मध्यप्रदेश सरकारची 'लाडली बहना योजना' ही 'लाडकी बहीण योजना' या नावाने कॉपी पेस्ट केली, जी अपेक्षेप्रमाणे फेमस झाली. या योजनेनंतर 100 दिवसांत सरकारने विविध योजना, विकासकामांचे तब्बल 5 हजार 106 शासन निर्णय म्हणजेच जीआर काढले. लाडकी बहिण योजनेचा लाभ प्रत्येक धर्माच्या, जातीच्या महिलांना मिळत असल्याने या महायूती सरकारकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन बदलत जात असताना, भाजपचे आमदार नितेश राणे मात्र सरकारला घरचा आहेर देत आहे, महायुती सरकारबद्दल तयार होत असलेल्या सहानुभूतीमधील हवा काढण्याचे काम राणेंकडून होत असल्याचे दिसत आहे.

नितेश राणे यांनी रविवारी अचलपूर, परतवाडा या जुळ्या नगरीमध्ये अत्यंत उग्र आणि त्वेषपुर्ण भाषण दिले, आणि जिल्ह्यातील वातावरण गढूळ होईल असा मसाला टाकून ते निघून गेले. सुदैवाने याचे चुकीचे पडसाद उमटले नाही. आमचे प्रतिनिधी अचलपूरातील मुस्लिम बहूल वस्तींमध्ये निवडणूकींचा



आढावा घेत असताना आपल्या खात्यावर लाडकी बहिण योजनेचा तिसरा हप्ता आल्याची एक चर्चा कानावर आली. या चर्चेमध्ये एक मुस्लिम महिला दुसऱ्या मुस्लिम महिलेशी खात्यावर पंधराशे रुपये जमा झाले काय ? असा प्रश्न विचारित होती. दुसऱ्या महिलेने चेहऱ्यावर स्मित हास्य फुलवीत हां आ गये ! असे म्हणत सरकार मस्त काम कर रही, मगर ये जो झगडे लगाने के काम हो रहे है, ये ठीक नही, हे वाक्य बोलत पुढची चर्चा कायम ठेवली.

भारतीय जनता पक्ष तसेच त्याच्या मित्र पक्षाला मुस्लिम समाजाची पसंती मिळेलच, याची खात्री नाही, परंतू तरीही महायुती सरकारकडून शासकीय तिजोरी रिकामी करुन आपल्या बाजूने मत वळविण्याचा प्रयत्न होत आहे. असे असताना नितेश राणे या प्रयत्नांना गालबोट लावित आहेत. तुम्ही बाहेरुन यायचे, येथे वाट्टेल ते बोलून गोंधळ घालायचा, आणि आमचे शेत खराब करुन निघून जायचे, असे म्हणत अनेक हिंदु धर्मीयांनीही रविवारच्या हिंदु महासभेवर टीका टीपणी केली आहे. भरपुर बोला, पण मुद्देसुद बोला! अश्या आजच्या पिढीची मागणी आहे, बाळासाहेब ठाकरेंचे भाषण प्रत्येकांच्या पसंतीस उतरण्याचे कारण तेच होते, ते मुद्देसूद बोलायचे, हिंदुत्वावर बोलायचे, आणि सर्वांना पटेल तेच मांडायचे. फक्त राळ फेकून रान पेटविण्याचा प्रकार कधी त्यांनी केला नाही, जो रविवारच्या महासभेत पहायला मिळाला. अशा भाषणांमूळे आगामी विधानसभा निवडणूकीवरही लोकसभेसारखे परिणाम महायुतीला भोगावे लागतील अशी शक्यता वर्तविली जात आहे.

# ग्रामपंचायत कार्यालय वडाळा

## पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती

## निविदा सुचना २३-२४

ग्रामपंचायत कार्यालय वडाळा, पंचायत समिती नबाजार, जिल्हा अमरावती यांचे मार्फत अनुसुचित जाती नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास व 15 वित्त आयोग योजनेअंतर्गत खालील कामांची मोहरबंद निविदा ब 1 टक्केवारी प्रपत्रामध्ये जि.प. बांधकाम विभाग अमरावती यांच्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारा कडून मागविण्यात येत आहे. को-या निविदा ग्रामपंचायत कार्यालय वडाळा, पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती यांचेकडून देण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखा शिर्षक | अंदाजित कि. रू. | बयाना रक्कम (१ %) | काम करण्याचा कालावधी | को-या निविदेची किंमत | निविदा स्विकारण्याची तारीख | निविदा उघडण्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॉंक्रीट रस्ता | अनुसूचित जाती नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास | ४,००,०००/- | ४००० | ३ महीने | २०० | ०३/१०/२०२४ ते १०/१०/२०२४ | ११/१०/२०२४ |
| २ | हातपंप फलाट कार्य तयार करणे | १५वा वित्त आयोग | १८२५९८/- | १८२५ | ३ महीने | २०० | | |
| ३ | सिमेंट रस्ता बांधकाम | १५वा वित्त आयोग | १२०५३४/- | १२०५ | ३ महीने | २०० | | |
| ४ | सिमेंट रस्ता बांधकाम | १५वा वित्त आयोग | ९६४२८/- | ९६४ | ३ महीने | २०० | | |
| ५ | अंगणवाडी पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १५वा वित्त आयोग | ५११२९/- | ५११ | ३ महीने | २०० | | |
| ६ | जि.प. शाळा दुरुस्ती करणे. | १५वा वित्त आयोग | ११४८२३/- | ११४८ | ३ महीने | २०० | | |
| ७ | हातपंप बसविणे | १५वा वित्त आयोग | २४००००/- | २४०० | ३ महीने | २०० | | |
| ८ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे | १५वा वित्त आयोग | ५०००००/- | ३८०० | ३ महीने | २०० | | |
| ९ | सिमेंट कॉंक्रिट नाली बांधकाम करणे | १५वा वित्त आयोग | ३८००००/- | ५००० | ३ महीने | २०० | | |
| १० | विशेष पाणी पुरवठा पाईपलाईन दुरुस्ती | १५वा वित्त आयोग | १६००००/- | १६०० | ३ महीने | २०० | | |
| ११ | प्लास्टिक शेड तयार करणे | १५वा वित्त आयोग | २२३०००/- | २२३० | ३ महीने | २०० | | |
| १२ | सोलर पंप लावणे | १५वा वित्त आयोग | ६५५०००/- | ६५५० | ३ महीने | २०० | | |
| १३ | एलईडी लाईट लावणे | १५वा वित्त आयोग | ३८००००/- | ३८०० | ३ महीने | २०० | | |
| १४ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे | १५वा वित्त आयोग | ४०००००/- | ४००० | ३ महीने | २०० | | |

टिप :- १) निविदाच्या अटी व शर्ती ग्रा.पं. कार्यालय वडाळा, पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

२) निविदा ह्या दोन लिफाफे पद्धतीने सादर करावयाच्या आहे.

३) निविदा स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहे.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत वडाळा**
**पं.स. नांदगांव खंडेश्वर जि.अमरावती.**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजुला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# श्याम मानवांच्या कार्यक्रमाचे बच्चू कडू आयोजक!

## जन्मलो काँग्रेसमध्ये आणि मरणारही काँग्रेसमध्येच-बबलू देशमुख

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - फक्त बच्चू कडूंवर बोला, भाजपविषयी बोलू नका! असा सल्ला दिल्याने काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी चांदूर बाजार येथे आयोजित केलेला कार्यक्रम आपण रद्द केला, ते भाजपचे स्लिपर सेल आहे, असा आरोप अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत श्याम मानव यांनी इलेक्ट्रॉनिक मिडीयाला दिलेल्या मुलाखतीमध्ये केला आहे. ज्यावर स्पष्टोक्ती देत बबलू देशमुख यांनी सांगितले की, श्याम मानवांचा कुठलाच कार्यक्रम मी चांदूर बाजार येथे आयोजित केला नव्हता. उलट माझी बदनामी करण्याकरिता आ.बच्चू कडू यांनी श्याम मानवांचा हा मुलाखत कार्यक्रम आयोजित केला असल्याचे भासत आहे. मध्यंतरी मी भाजपमध्ये जाणार अश्या वावड्या उठविण्यात आल्या होत्या. हा त्यातलाच प्रकार आहे, मी जन्मलो काँग्रेसमध्ये आणि मरणारही काँग्रेसमध्ये हे यावेळी पुन्हा एकदा मला सर्वांना स्पष्ट करायचे आहे.

बबलू देशमुख यांनी सांगितले की, श्याम मानव हे महाराष्ट्रातील एक प्रसिध्द व्यक्तीमत्त्व आहे. मी त्यांचे व्याख्यान वाचले आहे, परंतू वास्तवात त्यांची आणि माझी



कोठेच भेट झाली नाही. गेल्या 12 ते 13 वर्षांपासून मी काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष आहे. तेव्हापासून काँग्रेस जिल्ह्यात मजबूत आहे, आमच्याकडे जिल्हा परिषद होती, जिल्हा मध्यवर्ती बँक होती, तीन आमदार होते. आज खासदार आमच्याच पक्षाचे आहे. अचलपूर विधानसभा मतदारसंघामध्ये माझे वर्चस्व पुर्वीपेक्षाही अधिक वाढल्याने विद्यमान आमदार बच्चू कडू यांच्या पायाखालची जमीन सरकली आहे, त्यामूळे ते मला बदनाम करण्याच्या नवनवीन क्लुप्त्या शोधत आहे. श्याम मानव यांनी इलेक्ट्रॉनिक मिडीयाशी बोलताना सांगितले की, बच्चू कडू माझे मित्र आहे. त्यांनी आपले मित्रप्रेम राखत मला भाजपचे स्लिपर बनविले. त्यांनी मला काँग्रेसने हाकललं पाहीजे, असेही म्हटले आहे. काँग्रेसमधून कुणाला हाकलले पाहीजे, कुणाला ठेवले पाहीजे हे आमचे वरिष्ठ निर्णय घेतील. मी वयाच्या 17 वर्षांपासून काँग्रेसमध्ये काम करित आहे, आणि काँग्रेसमध्ये काम करतच माझा शेवट होईल. आगामी निवडणूकीत मी 50 ते 60 हजार मतांनी विजय प्राप्त करणार असल्याने विरोधक मला बदनाम करण्याकरिता विविध उपाययोजना करित आहे. त्यामधील हा एक उपाय असावा.

### काय म्हणाले होते श्याम मानव



अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष तथा संविधान बचाओ, देश बचाओ या व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते प्रा.श्याम मानव यांनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना भाजपचे स्लीपर सेल असे संबोधले होते. चांदुर बाजार येथील प्रा.श्याम मानव यांच्या व्याख्यानमालेमध्ये त्यांनी भाजप विरोधात बोलू नये तसेच आ.बच्चू कडू यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडाव्यात अशी अट बबलू देशमुख यांनी घातली होती. प्रा.श्याम मानव यांनी ही अट मान्य न केल्यामुळे बबलू देशमुख यांनी चक्क चांदुर बाजार येथील सभा रद्द केली असे बोलल्या जात आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये भाजपचे स्लीपर सेल असून हे देशासाठी घातक असल्याचा घणाघात यावेळी प्रा.श्याम मानव यांनी केला होता.



# करण ढाब्यावर धाड, देशी-विदेशी दारू जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )** - राजापेठ पोलिसांनी बुधवारी मोहन रामशंकर चौबे (62, रा.पवन नगर नं 01, गोपाल नगर) यांच्या पवननगरातील करण ढाबावर धाड टाकून देशी व विदेशी कंपनीच्या अवैध दारूचा 64 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

राजापेठचे पोलिस उपनिरीक्षक मिलींद हिवरे हे आपल्या पथकासह पेट्रोलिंग करीत असतांना पोलिस निरीक्षक पुनीत कुलट यांना गुप्त माहिती मिळाली की, मोहन रामशंकर चौबे याच्या करण ढाब्यावर अवैधरित्या दारुची विक्री सुरु आहे. या माहितीवरून राजापेठ पोलिसांनी करण ढाब्यावर धाड टाकली असता, तेथे मोठ्या प्रमाणात विदेशी दारु सापडली. याप्रकरणात आरोपी मोहन रामशंकर चौबेविरुध्द कलम 65 ई महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.

सदरची कारवाई पोलिस आयुक्त नविनचंद्र रेडडी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, पीएसआय मिलींद हिवरे, पोलिस हवालदार मनीष करपे, पंकज खटे, रवी लीखीतकर, गनराज राउत, सागर भजगवरे, माया अंबुलकर यांनी केली

# मनपाचे उपायुक्त शामकांत मस्के यांना मातृशोक

**महासागर प्रतिनिधी**



**अमरावती,( दि.2 )**- अमरावती महानगर पालिकेचे उपायुक्त शामकांत मस्के यांच्या मातोश्री लिलाबाई नामदेवराव मस्के यांचे आज दि.2 ऑक्टोबरला वृद्धापकाळाने निधन झाले. त्या 75 वर्षाच्या होत्या. उद्या गुरुवारी दि.3 ऑक्टोबरला दुपारी 12 वाजता यवतमाळ येथील चांदोरे नगरातील मस्के यांच्या निवासस्थानावरून अंतिमयात्रा निघेल. पांढरकवडा रोड येथील स्माशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात सेवानिवृत मुख्याद्यापक नामदेवराव मस्के, शिक्षण विस्तार अधिकारी प्रशांत मस्के, उपायुक्त शामकांत मस्के, मुलगी प्रज्ञाताई पाटील व मोठा आप्तपरिवार आहे.

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा आज जिल्हा दौरा

**अमरावती** -राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन गुरूवार, दि. 3 ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे गुरूवार, दि. 3 ऑक्टोबर रोजी दुपारी 3 वाजता बेलोरा विमानतळ येथे आगमन होईल. त्यानंतर दुपारी 3.45 वाजता अमरावती येथील शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल. सायंकाळी चार ते सहा वाजेपर्यंत विविध घटकांशी भेटी घेऊन चर्चा करतील. त्यांचा गुरूवारी अमरावती येथे मुक्काम राहणार आहे. शुक्रवार, दि. 4 ऑक्टोबर रोजी सकाळी 9.10 वाजता विश्रामृगह येथून बेलोरा विमानतळ हेलीपॅडकडे प्रयाण करतील. त्यानंतर सकाळी 9.40 वाजता बेलोरा विमानतळ येथून शासकीय हेलीकॉप्टरने बुलडाणाकडे प्रयाण करतील.

# पुष्पक खापरे राज्यपालांच्या हस्ते सन्मानित



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार( दि.2 )** - तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी व शेतकरी फळपिक विमा मार्गदर्शक पुष्पक श्रीरामजी खापरे यांना वसंतराव नाईक शेती मित्रपुरस्कार नुकताच महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे यांच्या उपस्थितीत मुंबई येथील सरदार वल्लभ भाई पटेल स्टेडियम येथे हा कार्यक्रम पार पडला.

पुष्पक खापरे हे सदैव अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा मार्गदर्शन नैसर्गिक आपत्ती, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना तसेच शेती विषयक सर्व उपयुक्त माहिती समाज माध्यम, आकाशवाणी, न्यूज चॅनेल च्या माध्यमातून शेतकऱ्यांना देत असतात. त्याचा मार्गदर्शनाचा लाभ अनेक शेतकऱ्यांना झाला आहे. अमरावती जिल्हाधिकारी समितीवर फळ पिक विमा व चांदूरबाजार तालुका पिक विमा निवारण समितीवर शेतकऱ्यांच्या अनेक वर्षापासून प्रश्न व त्याचे न्याय मिळवून देण्यासाठी प्रतिनिधित्व करत आहे. तसेच चांदुर बाजार सिट्रस इस्टेट वर कार्यकारी समितीमध्ये संत्रा फळ पिक उत्पादक शेतकऱ्यांसाठी सदैव कार्य करत असतात. त्यांना यापुर्वीही अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नुकतेच त्यांना वसंतराव नाईक पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# 47 वर्षानंतर मित्रांची पुन्हा भेट

## मोर्शीच्या शिवाजी शाळेने घेतला माजी विद्यार्थी मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.2 )**- स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथील 1977 या वर्षी दहावा वर्ग उत्तीर्ण झालेल्या व आज विविध पदावर नोकरी करून सेवानिवृत्त झालेल्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न झाला, हे सर्व माजी विद्यार्थी एक नवीन संकल्पना घेऊन शाळेत परत 47 वर्षानंतर एकत्रित आले.

सर्व विविध क्षेत्रात मोठया पदावर कार्य करून सेवानिवृत्त



झालेत परंतु सर्व शाळेत येऊन परत एक दिवस विद्यार्थी जीवन जगले. सर्वांचे शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उद्धव गीद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच शिक्षक राजेश मुंगसे यांनी या सर्व माजी विद्यार्थ्यांची पहिली तासिका घेऊन सर्वांना 47 वर्षाच्या आधीची त्यांच्या शालेय जीवनाची आठवण करून दिली. तसेच अशोक चौधरी, मिलिंद ढाकुलकर, उद्धव गिद यांनी तासिका घेऊन या माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनाची आठवण करून दिली. सर्वांनी आपल्या नावाने एक नावीन्य पूर्ण उपक्रम म्हणून आपल्या नावाने एक वृक्ष शाळेत लावले. या सर्व अधिकारी पदावरून सेवानिवृत्त माजी विद्यार्थ्यांनी शाळेला भेट दिल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.

# श्री अनुसयामाता नवदुर्गा संस्थानात नवरात्रोत्सवास प्रारंभ

## विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री अनुसयामाता नवदुर्गा संस्थान अजंनसिंगी येथे शारदीय नवरोत्रात्सवास आजपासुन प्रारंभ होत आहे, विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये गुरुवार दि.3 ऑक्टोबरला सकाळी 7 ते 12 या वेळात घटस्थापना होईल. त्यानंतर दि.10 रोजी सकाळी 9 वाजता होमहवन करण्यात येईल तर 11 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 7 ते रात्री 12 वाजेपर्यंत यवतमाळ येथील गायक जितू पाखरे यांच्या जनजागरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवार दि.12 रोजी सकाळी 10ते12 वाजेदरम्यान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन त्याचदिवशी 12 वाजता श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे घटविसर्जन करण्यात येईल. भाविकांनी धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन संत शोभामाता मंदिराचे सेवक रमेश चांदूरकर, अध्यक्ष श्याम रघाटाटे, उपाध्यक्ष नितीन भारे, सचिव नरेंद्र देशमुख, कोषाध्यक्ष सरिता गाखरे व समस्त ट्रस्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# सिंगल फेज तक्रारीबद्दल शेतकऱ्यांच्या तक्रारी

## भाजपने केली कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, ( दि.2 )**- हिवरखेड, डोंगर यावली, दापोरी, मायवाडी, खेड, डोमक येथील शेतकऱ्यांच्या महावितरणाबद्दल सिंगल फेज बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्या असता आज भारतीय जनता पक्षाच्या वतीने कार्यकारी अभियंता यांच्या दालनामध्ये बैठक घेऊन चर्चा केली.

सर्व लाईनमन यांना सूचना करून यापुढे सिंगल फेज लाईन देण्याबाबत सकारात्मक सूचना देण्यात आल्या तसेच ग्राहक सोबत या लाईनमन यांच्या बोलण्याच्या पद्धती चुकीच्या आहेत. त्यांच्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना सुद्धा मुख्य अभियंतांनी दिल्या.



त्यावेळी भारतीय जनता पक्ष जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, शहर अध्यक्ष राहुल चौधरी, उमेश कोंडे, प्रमोद हरणे, गोपाल मालपे, युवा मोर्चा अध्यक्ष नितीन चिखले, राजु सावरकर, मनोज कडू, गौरव घोंगडे, विलास आघाडे, नितीन उमाळे, रामभाऊ जामठे, निलेश नांदुरकर, अभिजित श्रीराव, युवराज अंधारे, निलेश पू. अंधारे, विनय अंधारे, अंकुश धावडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सुधारित धोरण जाहीर

# जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांचा संभ्रम अखेर संपला

## दुर्गम क्षेत्रातील शिक्षकांना प्रथमच बदली प्रक्रियेत मिळणार न्याय

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.2 )** - जिल्हा परिषद शिक्षकांच्या यंदा बदल्या होणार की नाही, यावरून संभ्रमाचे वातावरण होते, परंतु ग्रामविकास खात्याने जिल्ह्यांतर्गत बदल्यांचे सुधारित धोरण जाहीर केल्याने शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे, यंदा पहिल्यांदाच दुर्गम क्षेत्रातील शिक्षकांनाही या बदली प्रक्रियेत संधी मिळणार आहे.

बदलीचे सुधारित धोरण जाहीर करताना विविध शिक्षक संघटनांकडून शासनाने सूचना मागविल्या होत्या. बदली अभ्यास गटाने प्रहार शिक्षक संघटनेच्या निवेदनाची दखल घेऊन सुधारित धोरण जाहीर केले आहे. त्यात अवघड क्षेत्र,



सुगम क्षेत्र, बदली अधिकार प्राप्त शिक्षक, बदलीपात्र शिक्षक, बदल्यांसाठी शिक्षकांचे विशेष संवर्ग, विशेष संवर्गाचा लाभ घेण्यासाठीचे निकष अशा विविध मुद्द्यांची स्पष्टता करण्यात आली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या धोरणानुसार बदल्यांपूर्वी रिक्त जागा जाहीर करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

पूर्वी दुर्गम क्षेत्रात असलेल्या गावांना 2018 नंतर सुगममध्ये समाविष्ट करण्यात आले होते. 2022 मध्ये अशा गावातील शिक्षकांना अवघड क्षेत्रांतर्गत बदली मिळाली नव्हती. त्यामुळे त्या शिक्षकांवर हा अन्याय झाला होता. यात बदल करण्यासंदर्भात विनंती प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी शासनाला केली होती. त्यामुळे आता पुन्हा एकदा या शिक्षकांना संधी मिळणार आहे. अवघड क्षेत्रांतर्गत त्यांना सोयीच्या ठिकाणी बदली प्राप्त होणार आहे. दुर्गममधील शिक्षकांची अवघड क्षेत्रातील सेवाज्येष्ठता ग्राह्य धरण्यात येणार आहे. अवघड क्षेत्रामधून सुगम क्षेत्रात बदलीकरिता शिक्षकांची एकूण सेवाज्येष्ठता धरण्यात येत होती. त्यामुळे अवघड क्षेत्रात जास्त सेवा होऊनही अशा शिक्षकांना बदली प्रक्रियेत न्याय मिळत नव्हता. यात बदल करण्याची विनंती प्रहार शिक्षक संघटनेने शासनास केली होती. त्यामुळे अवघड क्षेत्रात ज्यांनी सेवा जास्त झालेली आहे, त्यांची सेवा ग्राह्य धरून त्यांना आता सुगम क्षेत्रात प्राधान्याने बदल्या प्राप्त होणार आहेत. शिक्षकांच्या बदल्या यंदाही ऑनलाइन पद्धतीनेच होणार असून बदली प्रक्रियेचे प्राधिकारी संबंधित जिल्हा परिषदेचे सीईओच राहणार आहेत. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल ऑफिसर असेल. एकूण रिक्त असलेल्या जागा प्राधान्यक्रम भरण्यापूर्वी दाखविण्यात याव्यात, अशी मागणी प्रहार शिक्षक संघटनेने केली होती. ती मागणी अखेर मान्य करण्यात आली असून आता 30 प्राधान्यक्रम भरण्यापूर्वी झालेल्या बदल्या व एकूण रिक्त जागा दुर्गम मधील सर्व शिक्षकांना दिसणार आहेत.

> प्रहार शिक्षक संघटनेच्या शासन स्तरावरील सततच्या पाठपुराव्याने दुर्गममधील शिक्षकांना जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रियेत खऱ्या अर्थाने न्याय मिळाल्याचे समाधान आहे. मागणीवरून तीन न्यायपूर्ण बदल झाल्याने दुर्गममधील शिक्षकांच्या बदलीचा मार्ग आता सुकर झाला आहे.
>
> **महेश ठाकरे,**
> **राज्याध्यक्ष,**
> **प्रहार शिक्षक संघटना.**

# गावागावात भांडण तटे, अवैध धंदे फोफावले

## तंटामुक्त गाव समित्यांचे सक्षमीकरण गरजेचे

**बादल डकरे**

**चांदूर बाजार, ( दि.2 )**- गावागावातील भांडण तंट्यांचा निपटारा गावातच व्हावा, गावातील लोकांना पोलिस स्टेशनपर्यंत तसेच न्यायालयाची पायरी चढण्याची वेळ येऊ नये, पोलिस यंत्रणेवरील कामाचा ताण कमी होऊन गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर तंटामुक्त समित्यांची स्थापना करण्यात आली. परंतु सद्यस्थितीत या समितीमधील लोकांचा उत्साह कमी झाल्याचे चित्र प्रत्येक गावात पहावयास मिळत आहे.

तत्कालीन गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी 15 ऑगस्ट 2007 मध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान सुरू केले होते. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना सरकारने पुरस्कार देऊन गौरवले होते. परंतु प्रारंभीच्या काळात गावातील अवैध धंदे व भांडण तंटे बंद झाले होते. आता समित्यांमधील त्या-त्या गावातील समिती सदस्यांना फारसा रस राहिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अवैध व्यवसायाबरोबरच भांडण तंट्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे गावातील समित्या नाममात्र ठरत आहेत. गावागावातील वाद आता पोलिस स्टेशनपर्यंत जाऊन पोहोचत आहे. परिणामी समित्यांच्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. यानिमित्ताने समित्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

### प्रशासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष

आजच्या घडीला अनेक गावातील तंटामुक्त समिती ही कागदोपत्रीच दिसून येते. जी गावे तंटामुक्त झाली होती, त्याच गावातील भांडण तंटे पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे समित्या फक्त कागदावरच आहे. प्रत्यक्षात गावातील तंटा गावातच मिटवून पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचू नये, हा उदात्त हेतू अपयशी ठरत आहे. गावागावात प्रशासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे अवैध धंद्यात वाढ होऊन भांडणे वाढली आहे. तंटामुक्त समित्यांचे अध्यक्ष, सदस्य हे काही गावात नावापुरतेच आहे. त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देऊन तंटामुक्त समितीची फेररचना करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर रिक्त असलेल्या जागा त्वरित भरून समितीला बळकटी द्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.